
REGISTERED No. 83434.




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख २५ जून १९४७ अंक २६








मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी

**दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी**

९६ नारायण पेठ, पुणें २.




## साठे बिस्किटें

**ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.**

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल गिऱ्हाइकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें।

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

-सर्व प्रांतांतील-

सुती—गरम—रेशमी

--खादीचें माहेरघर--

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २

# विविध माहिती

**जपानमधील कोळशाच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण**—जपानमध्यें नुकत्याच अधिकारावर आलेल्या सरकारच्या आर्थिक कार्यक्रमांत कोळशाच्या खाणींच्या राष्ट्रीयीकरणाला अग्रस्थान देण्यांत आलें आहे. राष्ट्रीयीकरणाचा हेतु कोळशाचें वार्षिक उत्पादन ३ कोटी टनांपर्यंत वाढविण्याचा आहे.

**नेपाळ–हिंदुस्थानचे वकिलातीचे संबंध**—नेपाळचें सरकार आणि हिंदुस्थान सरकार ह्यांनीं परस्परांकडे दरबारी वकील नेमण्याचें ठरविलें आहे असें हिंदुस्थान सरकारतर्फे नुकतेंच जाहीर करण्यांत आलें. नेपाळमधील आर्थिक विकासाला अमेरिका हातभार लावणार असल्यानें ह्या विकासांत हिंदुस्थानच्या हितसंबंधांचें रक्षण करण्याच्या दृष्टीनें ही घोषणा महत्त्वाची आहे.

**काठेवाडमधील मच्छीमारीचा धंदा**—काठेवाडच्या समुद्रांत मच्छीमारीचा धंदा करण्यासंबंधीं एका मोठ्या कंपनीकडून हल्ली पहाणी चालू आहे. खाण्यास योग्य अशा माशांचा अन्नपुरवठा, त्यांची निपज आणि त्यांच्या हालचाली विचारांत घेऊन धंद्याची शास्त्रीय उभारणी करण्यांत येणार आहे. खाण्याखेरीज माशांच्या खाऊन उरलेल्या भागांचा खतासारखा उपयोग करतां येईल असें तज्ज्ञांचें मत आहे.

**चार्ली चॅपलिनच्या हद्दपारीची मागणी**—अमेरिकन विधिमंडळाच्या कनिष्ठ सभागृहांतील एका सभासदानें सुप्रसिद्ध विनोदी नट चार्ली चॅपलिन ह्याला अमेरिकेंतून हद्दपार करावा अशी मागणी केली. ह्या सभासदाच्या मतें चार्ली चॅपलिनचे चित्रपट अमेरिकन समाजरचनेला धोका देणारे आहेत. चार्ली चॅपलिन ह्यांनीं ह्या आरोपाला असें उत्तर दिलें कीं, चित्रपटांचा उपयोग करून विचारस्वातंत्र्याचा हक्क बजावण्याला बंदी करणें म्हणजे फॅसिस्ट पद्धतीचें अनुकरण करणेंच होय.

**रशिअन उद्योगधंद्यांत टेलिव्हिजनचा उपयोग**—लोखंड आणि पोलाद गाळण्याच्या भट्ट्यांतील रासायनिक प्रक्रिया कोठवर आली आहे, तें टेलिव्हिजनच्या पडद्यावर दिसण्याची व्यवस्था रशिअन कारखान्यांतून करण्यांत आली आहे. जांभळ्या व तांबड्या प्रकाशकिरणांच्या पलीकडे असलेल्या सूक्ष्म प्रकाशकिरणांनीं भट्ट्यांच्या भिंती पलीकडील प्रक्रिया पडद्यावर प्रकाशित होणार आहे. मोटारच्या एंजिनमधील पिस्टन तयार करण्याच्या सर्व व्यवस्था टेलिव्हिजन यंत्रांच्या साह्यानें एकच इंजिनिअर नियंत्रित करूं शकतो.

**साखर कामगारांचें वेतन**—संयुक्त प्रांत व बिहार ह्यांच्या सरकारांनीं साखरेच्या कारखान्यांतून काम करणाऱ्या मजुरांच्या वेतनाची चौकशी करण्यासाठी एक कमिटी नेमली होती. कमिटीच्या शिफारसीप्रमाणें बिहार सरकारनें साध्या मजुराचें वेतन महिना ३६ रु. पर्यंत वाढविलें आहे. महागाई भत्त्याचा समावेश वरील रकमेंतच करण्यांत आला आहे.

**पॅलेस्टाईन चौकशीकमिटीवर बहिष्कार**—संयुक्त राष्ट्रसंघानें पॅलेस्टाईनच्या प्रश्नाची चौकशी करण्याकरितां नेमलेल्या कमिटीचें कामकाज चालू झालें. परंतु अरब हायर कमिटी ह्या अरबांच्या संघटनेनें चौकशी कमिटीचा निषेध करण्यासाठी पहिल्याच दिवशीं संपूर्ण हरताळ पाळला.

**दफनाचे खड्डे खणणारे दुर्मीळ**—ब्रिटनमध्यें दफनविधीचे खड्डे खणणारीं माणसें दुर्मीळ झाल्यानें नॉर्हॅंटस मधील पीटर्सबरो ह्या गांवीं दफनविधींचा खोळंबा होत आहे अशी वार्ता आहे.

**हिंदुस्थान–जपान व्यापार**—हिंदी सरकारनें जपानला पाठविलेल्या व्यापारी मंडळाचे अध्यक्ष श्री. तुळशीदास किलाचंद यांनीं चालू वर्षी हिंदुस्थान जपानला १० लाख गाठी कपास निर्यात करील अशी आशा प्रदर्शित केली. ह्याशिवाय मँगेनीजची माती, ताग आणि गळिताचीं धान्यें ह्यांचयाही निर्यातीची संभाव्यता त्यांनीं व्यक्त केली.

**जागतिक लोकर परिषद**—आंतरराष्ट्रीय लोकर परिषदेचें १६ वें अधिवेशन नुकतेंच भरलें होतें. परिषदेंत लोकरीचा व्यापार अनिर्बंध असावा आणि ह्या धंद्यासंबंधीं शास्त्रीय माहितीची देवाणघेवाण मुक्त हस्तानें करण्यांत यावी असे दोन ठराव मंजूर करण्यांत आले.

**ब्रिटिश स्त्रियांना इषारा**—ब्रिटिश मजूर पक्षांतील स्त्री-सभासदांना बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष, सर स्टॅफर्ड क्रिप्स, ह्यांनीं असा इषारा दिला आहे कीं, अत्यंत जरूरीच्या वस्तूंपैकीं सुद्धां कांहीं वस्तू ब्रिटननें निर्यात केल्यां नाहींत, तर ब्रिटनचें दिवाळें वाजल्याखेरीज रहाणार नाहीं.

**रशिआचा अमेरिकेला नकार**—हंगेरीमध्यें नुकत्याच घडून आलेल्या राजकीय घटनाबद्दलचे अमेरिकन मत आपणांस अमान्य असल्याचें रशिआतर्फे जाहीर करण्यांत आलें आहे. हंगेरींत अद्याप सर्वपक्षीय सरकारच अधिकारावर असून, प्रधानमंडळाच्या खातेवाटणींत सुद्धा बदल करण्यांत आलेला नाहीं, असें रशिआचें म्हणणें आहे.

**इजिप्तची संयुक्त राष्ट्रसंघाकडे धांव**—१९३६ सालच्या इजिप्त व ब्रिटन ह्यांचेमधील तहाचा फेरविचार करण्याचें प्रकरण इजिप्त सरकारनें संयुक्त राष्ट्रसंघटनेकडे पाठविलें आहे.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवलः— | रु. ५०,००,००० |
| खपलेलें भांडवलः— | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवलः— | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडः— | रु. ३,९०,००० |
| एकूण खेळतें भांडवलः— | रु. २,००,००,००० |

नवें विक्रीस काढलेलें सर्व भांडवल खपलें आहे.

—ः बोर्ड ऑफ डायरेक्टर्सः—

श्री. धों. कृ. साठे, (चेअरमन) श्री. वा. पु. वर्दे (व्हा. चेअरमन)
श्री. न. गं. पवार, श्री. श्री. गो. मराठे, श्री. मा. रा. जोशी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा वि. शहा,
श्री. शं. ल. किर्लोस्कर, श्री. भा. म. गुप्ते,
श्री. मो. रा. ढमढेरे.

शाखाः—डेकन जिमखाना (पुणें), खडकी, मुंबई (फोर्ट), मुंबई (गिरगांव), नाशिक, चाळीसगांव, धुळें, जळगांव, फैजपूर (पे. ऑफिस), नागपूर (सिताबर्डी), नागपूर (इतवारी), रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कल्याण इ.

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

चिं. वि. जोग
मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. २५ जून, १९४७




प्रो. वा. मो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## सहकारी चळवळ पसरली, तरी तिची मूलतत्त्वें रुजलेलीं नाहींत

### नवें वातावरण निर्माण करण्याचा श्री. मेहता ह्यांचा संदेश

#### सहकारी कॉलेजची स्थापना

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटतर्फे चालविण्यांत यावयाच्या नव्या सहकारी ट्रेनिंग कॉलेजचें व महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी विद्यालयाचें उद्‌घाटन मुंबई सरकारचे अर्थ–ग्रामोद्योग-सहकार मंत्री, श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं ता. १४ रोजीं पुणें येथें केलें. त्या प्रसंगीं त्यांनीं सहकारी शिक्षणास मुंबई सरकार किती महत्त्व देत आहे, हें स्पष्ट करून सांगितलें. गेल्या वर्षी एप्रिलमध्यें कॉंग्रेस मंत्रिमंडळ स्थानापन्न झाल्याबरोबर तिनें सहकारी शिक्षणाच्या वाढीसंबंधीं सूचना करण्यासाठी सर जनार्दन मदन ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली. कमिटीच्या शिफारसींस सरकारनें सर्वसाधारण मान्यता तात्काळ दिली, इतकेंच नव्हें तर सहकारी संस्था व कार्यकर्ते ह्यांनींहि त्यांस पाठिंबा दिला. प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटकडे हें शिक्षणाचें काम सोपविण्यांत आलें आहे. मुंबई सरकारनें सहकारी चळवळीच्या प्रसारासाठीं केलेल्या योजनांचा फायदा सर्व वर्गांस मिळत नाहीं, अशी तक्रार लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या गेल्या अधिवेशनांत करण्यांत आली होती. तिचा उल्लेख श्री. मेहता ह्यांनीं आपल्या भाषणांत केला आणि इन्स्टिटयूटचें लक्ष त्या तक्रारीकडे वेधलें. ज्या संस्थेचें उद्‌घाटन करण्यांत आलें तिला कॉलेज असें संबोधण्यांत येत आहे. ही संस्था खेडेगांवांच्या अर्थशास्त्राचे अभ्यासाचे बाबतींत हिंदुस्थानांत अग्रेसर व्हावी अशी अपेक्षा श्री. मेहता ह्यांनीं व्यक्त केली.

सहकारी विषयावर प्रांताच्या स्थानिक भाषांतून वाङ्मय निर्माण होण्याच्या आवश्यकतेवर श्री. मेहता ह्यांनी भर दिला. इंग्रजी भाषेंत सहकारावर अनेक उत्कृष्ट ग्रंथ आहेत परंतु ग्रेट ब्रिटनशीं आपला असलेला घनिष्ट संबंध आतां तुटला म्हणजे शिक्षण क्षेत्रांत व कारभारांत इंग्रजीचें महत्त्व कमी होईल. तेव्हां, इंग्रजी ग्रंथ, पुस्तिका, इत्यादींची जागा घेणारें वाङ्मय तयार ठेवणें क्रमप्राप्तच ठरतें. ह्या बाबतींत नवें कॉलेज बरेंच कार्य करूं शकेल अशी आशा आहे. कॉलेज यशस्वी होणें हें, तें ज्यांची सेवा करणार अशा सहकारी संस्थाचें सहकार्य कितपत मिळवूं शकतें ह्यावर अवलंबून राहील. सरकारनें कॉलेजच्या खर्चाची भरपूर तरतूद केली आहे आणि कॉलेजचा अभ्यासक्रम पार पाडणारांस नोकऱ्यांत प्राधान्य देण्याचें धोरण सरकार ठेवणार आहे. सहकारी संस्थांनींहि असेंच धोरण राखणें इष्ट होईल, इतकेच नव्हे तर त्यांनीं आपण होऊन सहकारी शिक्षणाचे प्रसारावर अधिकाधिक खर्च करण्याची तत्परता दर्शवावी. सर्व सोसायटयांनीं आपल्या नफ्याचा कांहीं भाग सहकारी शिक्षणाच्या खर्चासाठीं वर्गणी देण्याकरितां राखून ठेवावा अशी कायद्यांत दुरुस्ती करण्याचा सरकारचा विचार आहेच. गेल्या पंधरा महिन्यांत सहकारी संस्थांच्या संख्येंत पुष्कळच वाढ झाली आहे, त्यांचें कार्यक्षेत्र विस्तृत झालें आहे आणि वेगवेगळ्या भागांतील व वर्गांतील लोक त्यांत हितसंबंधीं झाले आहेत. सहकारी चळवळीचा नॉन क्रेडिट विभाग युद्धापूर्वीच्या मानानें आतां पुष्कळच महत्त्वाचा झाला आहे. समाजाची घडी सहकारी तत्त्वावर बसविण्याच्या सरकारच्या ध्येयास हें धरून व पोषक असेंच आहे. शेतीसुधारणा, ग्रामोद्योगांची पुनर्घटना, शहरांत रहाण्याच्या सोयी आणि ग्राहकांच्या सोईप्रमाणें किरकोळ विक्रीची व्यवस्था, ह्या सर्वांची सहकारी पद्धतीनें योजना करण्यास तज्ञ व शिक्षित अशा कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे. सहकारी तत्त्व आणि त्याचा व्यावहारिक उपयोग ह्यांची सांगड घालूं शकणारे कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत. त्याविना सहकाराचा विस्तृत फैलाव यशस्वी होणें अशक्य आहे. हिंदुस्थानांत सहकारी चळवळीचा थोडाफार प्रसार झाला असला तरी चळवळीमागील सामाजिक व आर्थिक मूलतत्त्वें रुजलेलीं नाहींत. नियोजित कॉलेज सहकारी चळवळीस पोषक असें वातावरण निर्माण करूं शकेल अशी आशा श्री. मेहता ह्यांनी व्यक्त केली. स्वावलंबन आणि परस्पर-सहाय ह्यांचे पायावर सर्व जनता एके ठिकाणीं येऊन आपला आर्थिक उद्धार घडवून आणील अशी तळमळ निर्माण झाली पाहिजे, हे त्यांचे उद्‌गार मनन करण्याजोगे आहेत.

---

#### मुंबई प्रांताची कठीण अन्नधान्य परिस्थिति

मुंबई प्रांतांतील अन्नधान्याच्या परिस्थितीसंबंधी सरकारनें एक पत्रक काढून सध्या मिळणारा आठवड्याचा दर डोई शिधा कायम ठेवणें परदेशांतील धान्याच्या आयातीवर अवलंबून आहे, असें जाहीर केलें आहे. मे, १९४७ अखेर प्रांतांतील धान्याचा सांठा पुढीलप्रमाणें होता. तांदूळ ६८,००० टन, गहूं २८,३०० टन, ( ह्यांत बियाणासाठीं राखून ठेवलेला १८ हजार टन धरला आहे. ) बाजरी ११,००० टन, जोंधळा १,१९,८०० टन. मे अखेर एकंदर सांठा २,७०,१०० टन होता. मे, १९४६ अखेर प्रांतांतील धान्याचा सांठा ४,१३,८०० टन होता. बियाणासाठीं राखून ठेवलेलें धान्य सोडलें तर ह्या वर्षीचा मेअखेरचा सांठा १० आठवडे म्हणजे ऑगस्टच्या मध्यापर्यंत पुरेल असा अंदाज आहे. नोव्हेंबर, १९४६ ते मे, १९४७ पर्यंत सरकारी धान्य वसुली ३,६६,३०० टन झाली. ह्याच काळांत गेल्या वर्षी ३,९०,६०० टन धान्य सरकारी सक्तीच्या वसुलीनें जमा झालें होतें. ह्या वर्षाच्या उरलेल्या काळांत आणखी ३४,००० टन धान्य वसूल होईल. नोव्हेंबर १९४६ ते मे, १९४७ पर्यंत प्रांताबाहेरून आणलेल्या धान्याचा आंकडा २,९७,६०० टन आहे. जून, १९४७ करितां फक्त ४१,००० टन बाहेरून मिळावयाचे आहेत. त्यांत तांदूळ १६,००० टन, गहूं १०,५०० टन, मका ६,५०० टन, व बार्ली ८ हजार टन, अशी वर्गवारी आहे. प्रांतांतील सरकारी धान्य वसुलीचा उरलेला हिस्सा फारसा मोठा नसल्यानें सध्याचा शिधा कायम ठेवणें बाहेरच्या आयातीवर सर्वस्वी अवलंबून आहे.

# स्फुट विचार

## हिंदी रेल्वेजसंबंधीं गाऱ्हाणी

हिंदुस्थान सरकारचे वहातुक–मंत्री, डॉ. जॉन मथाई नुकतेच मुंबईला येऊन गेले. ही संधि साधून इंडिअन मर्चंटस् चेंबरचे अध्यक्ष श्री. रतिलाल गांधी ह्यांनीं हिंदी रेल्वेजच्या कारभाराविषयीं व्यापारी वर्गाचीं गाऱ्हाणीं त्यांच्या कानांवर घातलीं. ह्या गाऱ्हाण्यांचा थोडक्यांत गोषवारा पुढीलप्रमाणें आहे. ( १ ) मध्यवर्ती सरकारच्या अंदाज पत्रकाच्या गरजेनुसार हिंदी रेल्वेजचा, उत्पन्नाची बाब म्हणून उपयोग करण्यांत येतो. ( २ ) रेल्वेचे वहातुकीचे व उतारूंचे दर ह्यांचा देशाच्या आर्थिक धोरणाशीं मेळ घालण्यांत येत नाहीं. ( ३ ) देशांतील व्यापारी व धंदेवाईक वर्गाशीं रेल्वेचे कारभारी घनिष्ट संबंध ठेवीत नाहींत. ( ४ ) कच्च्या मालाची बंदरांकडे वहातूक आणि बंदरांपासून पक्क्या मालाची वहातूक सवलतीच्या कमी दरानें करण्यांत येते. ( ५ ) अंतर्गत व्यापाराच्या जरूरीच्या दृष्टीनें स्वस्ताईच्या व योग्य सवलती देण्याकडे दुर्लक्ष होतें. ( ६ ) रेल्वेसाठी लागणारीं एंजिनें, डबे व इतर सामुग्री बाहेरून आणण्याकडे चालकांचा ओढा असतो. ह्या बाबतींत हिंदुस्थान स्वयंपूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जात नाहींत. ( ७ ) हिंदुस्थानांतील निरनिराळ्या रेल्वेजचा कारभार परस्परांशीं पूर्णपणें असंबद्ध रीतीनें चालविला गेल्यामुळें निष्कारण खर्च होतो; तो वांचविण्याचा प्रयत्न केला जात नाहीं, इत्यादि. श्री. रतिलाल गांधी ह्यांनीं निवेदन केलेलीं गाऱ्हाणीं व तक्रारी रेल्वे कारभाराच्या टीकाकारांनीं अनेकदा जाहीर केलेलीं आहेत. असें असतांना तींच गाऱ्हाणीं पुन्हां उगाळण्याचा उद्देश उघडच आहे. हिंदुस्थान सरकारचें पूर्वीचें अंतरंग बदलून त्याला लोकाभिमुख स्वरूप आल्यामुळें ह्या गाऱ्हाण्यांची दाद लागेल अशीच श्री. गांधी यांची कल्पना असावी. श्री. गांधी ह्यांना डॉ. मथाई ह्यांनीं दिलेलें उत्तर फारसें आशादायक नाहीं. रेल्वेच्या दरांत झालेल्या वाढीचें समर्थन डॉ. मथाई यांनीं केलें. युद्ध सुरू झाल्यापासून हिंदी रेल्वेच्या दरांत फक्त १२½ टक्के वाढ झाली आहे. त्यामानानें सर्वसाधारण किंमतींत १६० टक्के वाढ झाली आहे असें समर्थन डॉ. मथाई यांनीं केलें. चलनवाढीमुळें झालेल्या सार्वत्रिक चढ्या किंमतींबद्दल मुळांतच हिंदी अर्थशास्त्रज्ञांची तक्रार आहे, तेव्हां रेल्वेचे दर आणि इतर किंमती ह्यांच्या तुलनेनें रेल्वेच्या दराच्या वाढीचें समर्थन कसें होणार ? रेल्वेज तोट्यांत चालूं नयेत, हें अर्थातच खरें आहे. श्री. गांधी ह्यांनीं रेल्वेजच्या कर्जावरील व्याजाचा बोजा कमी दराचें कर्ज काढून हलका करावा अशी सूचना केली होती. तिच्यावर डॉ. मथाई ह्यांनीं कांहींच मत व्यक्त केलें नाहीं आणि उरलेल्या सर्वसाधारण तक्रारींबद्दल राज्यघटनात्मक अनिश्चिततेचा हवाला देऊन टाकला. सध्याच्या परिस्थितींत हिंदी रेल्वेजच्या कारभारांत व वहातुकींत सुधारणा होण्याचें काम लांबणीवर पडणें अपरिहार्यच आहे.

## संप वाढले, त्या प्रमाणांत कामाचे दिवस बुडाले नाहींत

डिफेन्स ऑफ इंडिया रूल्स खालील लवादाच्या योजनेमुळें, जे औद्योगिक वांधे इतर मार्गांनीं सत्वर मिटूं शकले नसते ते लवादाकडे सोपविता आले आणि लवादाच्या निर्णयाची वाट पहाण्याऐवजी कामगार कामावर जाऊं शकले. त्याकारणानें वांधे फार दीर्घ काळ टिकले नाहींत. १९३९ ते १९४५ ह्या मुदतींत औद्योगिक वांध्यांची संख्या वाढली तरी सुद्धां कामगारांचे कामाचे दिवस कमीच वाया गेले. खालील तक्ता हें स्पष्टपणें दर्शवितो:—

| वर्ष | वांध्यांची संख्या | वाया गेलेले कामाचे दिवस |
|---|---|---|
| १९३९ | ४०६ | ४९, ९२, ७९५ |
| १९४३ | ७१६ | २३, ४२, २८७ |
| १९४५ | ८२९ | ४०, ५४, ४१९ |

१९४० सालीं मात्र ३२२ वांध्यांतच ७१, ७७, २८१ कामाचे दिवस वाया गेले होते, त्याचें कारण मुंबईमधील गिरण्यांतील सार्वत्रिक संप हें होय. संपाची झळ नेहमींच गिरण्यांस जास्त लागते. एकूण वांध्यांपैकीं ६०% वांधे पगारवाढ व बोनस ह्यांसाठी झाले. राहाणीची वाढती महर्गता आणि जीवनावश्यक जिनसांचा तुटवडा ह्यामुळें वांध्यांस अधिकच चालना मिळाली. एकूण संपापैकीं २०% संप यशस्वी झाले व ५०% संप अयशस्वी झाले. बाकीचे संप अंशतः यशस्वी झाले.

## मुंबई शेअर बाजारांतील भाव क्षणोक्षणी समजण्याचें साधन

शेअर बाजारांतील चालू भाव तात्काळ कळण्याची व्यवस्था कमर्शिअल ब्रॉडकास्टस लि. ह्यांनीं केली आहे. बॉम्बे म्युच्युअल ला. ॲ. कं. लि. चे चीफ एजंट्स मेसर्स मोहन सन्स ॲंड कं. चे श्री. जलंदवाला ह्यांनीं त्यांत पुढाकार घेतला आहे. कमर्शिअल ब्रॉडकास्टस लि. चा एक नोकर शेअर बाजारांत बसून एकसारखा चालू बाजार भाव सांगत असतो, ते ब्रॉडकास्ट केले जाऊन वर्गणी भरणाऱ्या लोकांना रेडिओद्वारा ऐकण्यास मिळतात. त्यामुळें ऐकणारास फारच थोड्या वेळांत पाहिजे तो चालू बाजारभाव कळूं शकतो. ह्या रेडिओ योजनेचा फायदा घेणारांस सालिना ५०० रु. फी पडते. तूर्त मुंबई शहरापुरतीच ही योजना मर्यादित आहे. बाजारभावांत चढउतार होत असतो, तेव्हां कित्येक वेळां दलाल लोक गाळे खातात अशी गिऱ्हाइकांची तक्रार असते. रेडिओवर बाजारभाव ऐकून ऑर्डरी देणारांना ह्यापुढें योग्य भावच मिळूं शकेल. क्रिकेटच्या सामन्यावर जशी धावती टीका चालू असते व आपणांस सामन्याचा बदलता रागरंग एक सारखा कळूं शकतो, तद्वतच बाजाराचा चढउतार कळण्यासाठीं आतां मिनिटभरहि थांबण्याचें कारण नाहीं. शेअरबाजाराप्रमाणें इतर सर्व बाजारांतील भावहि देण्यास कमर्शिअल ब्रॉडकास्टस लि. नें प्रारंभ केला व मुंबई बाहेरहि त्याचे रेडिओ उपलब्ध झाले म्हणजे बाजारांचें जाळें पसरण्यास व सट्टेबाजी वाढण्यास निश्चित सहाय होईल ! मुंबईच्या कांहीं दलालांनीं हे रेडिओ घेतले आहेत आणि ग्राहकांची संख्या लवकरच वाढेलहि. शेअर बाजाराचे अध्यक्ष श्री. के. आर. पी. श्रॉफ ह्यांनीं प्रस्तुत योजनेचें नुकतेंच उद्घाटन केलें.

## हिंदुस्थानांतील व पाकिस्तानांतील आयुर्विमा कंपन्या

हिंदुस्थानांत नोंदलेल्या एकूण विमा कंपन्यांची संख्या २२[illegible] आहे. त्यांतील ८ संस्थानी हद्दींत आहेत. उरलेल्या २१८ कंपन्यांपैकी फक्त २० कंपन्यांच्या मुख्य कचेऱ्या पाकिस्तानांत समाविष्ट होतील आणि बाकीच्या संयुक्त हिंदुस्थानांत रहातील. त्यांचे संबंधांतील तुलनात्मक आकडे खाली दिले आहेत:—

( आकडे हजार रुपयांचे आहेत. )

| कंपन्या | वसूलभांडवल | आयुर्विमानिधी | एकूण जिंदगी | विम्याचें चालू काम |
|---|---|---|---|---|
| हिंदुस्थानांतील | ८,९९,६१ | १७,६७,९९ | १,२५,३५,८४ | २२,२३,२५३ |
| पाकिस्तानांतील | ३९,०९ | ९,३२,०७ | ११,३७,७१ | २,०७,६५० |
| संस्थानांतील | ४३,२५ | ४८,६६ | १,०५,१३ | २२,५२५ |

## अमेरिकेच्या परराष्ट्रीच्या धोरणाची आर्थिक पार्श्वभूमि

दुसऱ्या जागतिक महायुद्धाची युरोपपुरती अखेर होऊन दोन वर्षांचा काळ आतां लोटला आहे. युरोपमधील युद्धाची इतिश्री झाल्यावर सुमारें चार महिन्यांच्या आंतच जपान शरण आला आणि दुसऱ्या जागतिक युद्धाच्या ज्वाला विझल्या. तथापि, युद्ध हें राजकारणाचेंच एक विक्राळ स्वरूप असल्यानें जागतिक राजकारणांतील आनिर्णित प्रश्न सोडवावयाचे शिल्लकच राहिले आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या स्वरूपाच्या संयुक्त-राष्ट्र संघटनेसारख्या संस्था अस्तित्वांत आल्या तरी अशा संस्थांचें कार्य निदान आज तरी युद्ध टाळण्यापुरतेंच मर्यादित राहिलेलें आहे; आणि प्रत्यक्ष व्यवहारांत बलिष्ठ राष्ट्रांची आपसांत स्पर्धा लागून राहिलेली आहे. आंतरराष्ट्रिय परिस्थिती ह्या बलिष्ठांच्या हेव्या दाव्यांच्या आंदोलनावर हेलकावे खात आहे. संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या सुरक्षितता समितिवर रशिआ, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स व चीन हे कायमचे सभासद म्हणून असले तरी खरी तेढ रशिआ आणि अमेरिका ह्यांच्या परस्पर संबंधांतच दिसून येत आहे. ह्या दोन मोठ्या राष्ट्रांचें वाढतें वितुष्ट त्यांच्या परस्पर विरुद्ध अर्थ व्यवस्थेंत आहे, हें नाकारून चालणार नाहीं.

अमेरिकेंत आगामी आर्थिक अरिष्टांची चर्चा अगदीं उघडपणें चालूं आहे. मोठमोठ्या अमेरिकन शहरांतील टॅक्सी ड्रायव्हरपासून ते उद्योगधंद्यांतील बड्या 'दादा' पर्यंत, सर्वांना ह्या अरिष्टाची अस्पष्ट जाणीव आहे. अमेरिकेचे अध्यक्ष, प्रे. ट्रुमन ह्यांनीं मालाच्या किंमती उतरविण्याबद्दल राष्ट्राला उद्देशून एक भाषण केलें होतें. त्याचा फारसा उपयोग न होता किंमती वाढतच चालल्या आहेत. ह्या आर्थिक अरिष्टाचें स्वरूप काय राहील ह्याबद्दल मतभेद असले, तरी त्याचें क्षेत्र आणि परिणाम फार विलक्षण होतील. १९२९ सालच्या आर्थिक अरिष्टालाही हें नवीन गंडांतर मागें टाकील असा फार संभव आहे. उत्पादन व्यवस्थेंत अडथळे न येता किंमती चढत्या ठेवून अगर राहूनच माल बाजारांत पडून राहील असा अंदाज कांहीं तज्ञ करीत आहेत. अर्थशास्त्राच्या परिभाषेंत बोलावयाचें तर आगामी अरिष्ट चढत्या किंमतीमुळें (इनफ्लेशनरी क्रायसिस) ओढवेल, मालाच्या उत्पादनांत घट झाल्यामुळें (क्रायसिस ऑफ अंडर प्रॉडक्शन) ओढवणार नाहीं. अरिष्टांच्या कार्यकारणभावाची ही मीमांसा कितपत बरोबर आहे, हें काळच ठरविणार आहे. दरम्यान ह्या अरिष्टाच्या चिंतेनें अमेरिकन सरकारचें धोरण कसें उघडपणें आक्रमक होत चाललें आहे, हें पहाणें अगत्याचें आहे. अमेरिकन मालाची घरची बाजारपेठ चढत्या किंमतीमुळें दिवसानुदिवस आटत जाणार. त्याची जाणीव अमेरिकन सरकारला असल्यामुळें अमेरिकेबाहेरील राष्ट्रांना कर्जें देऊन, अगर उधारीच्या सवलती देऊन हुकमी बाजारपेठा निर्माण करण्याचा अमेरिकन सरकारचा इरादा स्पष्ट दिसत आहे. ग्रीसला आणि तुर्कस्थानला मंजूर झालेलीं कर्जें, फ्रान्सला देण्यांत आलेलें कर्ज, चीनला द्यावयाच्या कर्जाच्या वाटाघाटी आणि युरोपांतील देशांना आर्थिक साह्य देण्यासंबंधीं नुकतीच झालेली परराष्ट्रमंत्री, मार्शल यांची योजना, इत्यादी घटनांची संगति अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या अडचणींच्या अनुरोधानेंच लावतां येईल. तथापि, ह्या व्यवहाराला केवळ आर्थिक हेतूच कारण आहेत असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. कारण, पूर्व युरोपांतील, कमी अधिक प्रमाणांत समाजवादी अर्थव्यवस्थेकडे वाट चालणाऱ्या राष्ट्रांबाबत प्रे. ट्रुमन ह्यांच्या सरकारचें धोरण आर्थिक अडवणुकीचे आणि धाकदपटशाचें आहे हें उघड दिसून येत आहे. म्हणून आर्थिक सहा-


### दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

स्थापना सन १९२७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० दोन लक्ष | रुपये |
| भरलेलें भांडवल | ७१,२२० | रुपये |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० चे वर | रुपये |
| खेळतें भांडवल | ९,००,००० | रुपये |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासद, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर ३ टक्के व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, रेल्वे रसीदची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

दी
### बँक ऑफ कोल्हापूर, लि.

*(कोल्हापूर येथें सन १९२६ सालीं स्थापन झालेली व भागिदारांची मर्यादित जबाबदारी असलेली.)*

एच. एच. दी छत्रपति महाराजासाहेब ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,०६,५०० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. | ५,०६,५०० |
| भरलेलें | रु. | २,५३,००० |
| रिझर्व्ह | रु. | ४,०५,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. १,००,००,००० हून अधिक

मुख्य कचेरी—बँक ऑफ कोल्हापूर बिल्डिंग, लक्ष्मीपुरी-कोल्हापूर.

शाखा : संस्थानांतील:—(१) शाहुपुरी-कोल्हापूर, (२) गुजरी-कोल्हापूर, (३) जयसिंगपूर, (४) इचलकरंजी, (५) पेठ-वडगांव, (६) मलकापूर, (७) गडहिंग्लज. संस्थानाबाहेरील:—(८) मुंबई, (९) निपाणी (जि. बेळगांव)

★ चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

★ योग्य तारणावर कर्जें, ओव्हरड्रॉफ्टस व कॅश क्रेडिटस दिलीं जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

मौल्यवान चीजवस्तु सुरक्षित ठेवण्यासाठी हेड ऑफिसमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची उत्तम व्यवस्था.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

व्ही. प. सावंत, ॲ. मॅनेजर

त्याच्या पातळ आवरणाखाली दिलेलीं, हीं राजकीय कर्जें आहेत अशी टीका अमेरिकन सरकारवर होत आहे. अमेरिकेच्या आर्थिक आक्रमणाच्या धोरणाचीं प्रत्यक्ष उदाहरणें पाहणें ह्या दृष्टीनें जरूर आहे.

पूर्व युरोपांतील राष्ट्रांतून आज आर्थिक नियोजनाच्या पांच योजना आखल्या गेल्या असून त्या पुढील प्रमाणें आहेत. पोलंडची त्रिवार्षिक योजना, झेकोस्लोव्हाकिआची द्विवार्षिक योजना, युगोस्लाव्हिआचा पंचवार्षिक कार्यक्रम, बल्गेरिआची द्विवार्षिक योजना आणि अल्बानिअन सरकारची योजना. युद्धामुळें उध्वस्त झालेल्या ह्या छोट्या राष्ट्रांना आर्थिक साह्याची गरज आहे पण त्यासाठी राष्ट्रीय स्वातंत्र्य गहाण टाकण्याची ह्या देशांतील सरकारांची तयारी नाहीं. अमेरिका ह्या राष्ट्रांना ज्या अटींवर कर्जें देण्यास तयार आहे, त्या मान्य केल्या गेल्यास त्यांच्यावर अप्रत्यक्ष अमेरिकन वर्चस्व रहाणार आहे. शिवाय अशा वर्चस्वामुळें आप-आपली अर्थव्यवस्था राष्ट्राच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें संघटित करता येणार नाहीं अशीही भीती ह्या राष्ट्रांना वाटत आहे. त्यासंबंधीं युगोस्लाव्हिआचे पंतप्रधान, मार्शल टिटो ह्यांनीं एक उदाहरण दिलेलें आहे, तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. युगोस्लाव्हिआंत तेलाच्या खाणी सांपडणें शक्य असतांना सुद्धा युद्धपूर्व काळांत परदेशी कंपन्या तेल बाहेरून आयात करीत असत. स्वतंत्र राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेंत अशा प्रकारचे परकीय हितसंबंध असणें कसें बाधक होतें, तें ह्या उदाहरणावरून सहज कळतें. वस्तुस्थिति अशी असतांना परवा प्रे. ट्रुमन यांनीं रुमेनिअन सरकारला अशी धमकी दिली कीं रुमेनिअन सरकारचे उद्योगधंद्यासंबंधींचे कायदे अमेरिकन हितसंबंधांना बाधक होता कामा नयेत. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या मूलतत्त्वांत स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला महत्त्वाचें स्थान देण्यांत आलेलें आहे; आणि तें योग्यच आहे. राष्ट्रांच्या हक्काच्या ह्या सनदेला अमेरिकेची अनुमति असतांना केवळ पैशाचे पाठबळावरच छोट्या, पण अमेरिकन लोकशाहीपेक्षां वेगळ्या प्रकारच्या लोकशाही सत्तांवर आर्थिक दमदाटी होत आहे. अमेरिकन भांडवलशाहीच्या जाचक अटी जें राष्ट्र स्वीकारणार नाहीं त्याला अमेरिकन सरकार मदत करण्यास तयार नाहीं असा याचा अर्थ होत नाहीं काय ?

एवंच, अमेरिकन भांडवलशाहीला बाल्कन्सची बाजारपेठ मिळविण्याची तृष्णा लागलेली असून सोव्हिएट रशिआला व त्याच्या अर्थव्यवस्थेचें अनुकरण करणाऱ्या पूर्व युरोपांतील राष्ट्रांना ती बाधक वाटत आहे.

युरोपच्या व पर्यायानें जगाच्या आर्थिक पुनर्घटनेच्या निमित्तानें आपली डॉलर्सची हुकुमशाही जगावर लादण्याचा प्रयत्न अमेरिका करीत आहे. जगांतील सामान्य जनतेची आर्थिक स्थिति सुधारण्याच्या कार्यांत अमेरिकेला अत्यंत महत्त्वाचें कार्य करता येण्याजोगें आहे. तथापि, त्याच्या मर्यादा सांभाळल्या गेल्या पाहिजेत. नाहींतर, त्याच्या निमित्तानें जागतिक जबाबदाऱ्या पत्करून त्याचें परिमाण आटोक्यांत ठेवण्याचें अवघड कार्य अमेरिकेस करावें लागेल, आणि त्यांत यश आलें नाहीं तर धनको बरोबर ऋणको राष्ट्रांसहि दुष्परिणाम भोगावे लागतील.

—ग. र. जो.

### उद्बोधक उद्गार

" हिंदुस्थान सरकारास करवसुलीचे नवे मार्ग आतां शिल्लक उरलेले नाहींत आणि धडाडीच्या लोकांस सरकारचा कारभार तीव्रतेनें जाणवूं लागला आहे. उद्योगपती आतां उपयुक्त आणि चांगल्या योजना सोडून देऊं लागले आहेत. " :—मद्रास शेअर बाजाराचे मावळते अध्यक्ष, श्री. अनमलाइ चेट्टिअर.

Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. by an order from the Examiner of Capital Issues, Finance Department, New Delhi of which a complete copy is open to public inspection at the Head office of the Company.

It must be distinctly understood that in giving the consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.

## धी लोकमान्य मिल्स बार्शी लि.

**अधिकृत भांडवल : : रु. ३०,००,०००**

**विक्रीस काढलेले शेअर्स १२,८००**

★ प्रत्येकीं रुपये १२५ चे व प्रत्येक शेअरला अर्जासोबत डिपॉझिट रु. १० व अलॉटमेंटनंतर रु. १५ व पुढें दोन महिन्यापेक्षां कमी नाहीं अशा अंतरानें रु. २० चा हप्ता याप्रमाणें भरावयाचे.

★ पूर्वीच्या शेअर होल्डरांस प्रत्येक चार शेअरमागें पांच शेअर या प्रमाणांत शेअर घेण्याचा हक्क आहे. व तो त्यांनीं ता. ३०–६–४७ पर्यंत मिल कंपनीस कळवावा. वरीलप्रमाणें अग्रहक्कानें न घेतलेले शेअर्स मे. बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ठरवितील त्या प्रमाणांत स्वीकारले जातील.

शेअरच्या अर्जाचे फॉर्म कंपनीच्या ऑफिसांत मिळतील.

भगवंत पंढरीनाथ सुलाखे
मॅनेजिंग एजंट
फॉर सुलाखे आणि कंपनी, बार्शी.

## DECCAN INSTITUTE OF COMMERCE, POONA.

**( Recognised by Government ).**

Classes for the 1947-48 Session will begin on Thursday the 26th June 1947. Students coached up for G. D., C. & C., D. Com. ( I. M. C. ), R. A. (1st), G. D. C. & A. Indian Institute of Bankers, Shorthand and Typewriting. Courses suitable for Graduates, Matriculates and Non-Matriculates. Classes in the morning and evening. Prospectus free on application to :

257, C, Budhwar Peth,
Opp. Pharaskhana Haud,
Poona City. } **Secretary.**

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

साप्ताहिक बंद भाव


| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १७।६।४७ | बुधवार १८।६।४७ | गुरुवार १९।६।४७ | शुक्रवार २०।६।४७ | सोमवार २३।६।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| [illegible]; २४२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २०४२-८ | १९७५ | २०३२-८ | २०४० | १९८० |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३९९-८ | ३९० | ३९७-८ | ३९८ | ३९०-८ |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २९-१० | २८-६ | २९-१४ | २९-१० | २८-४ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३५-१२ | ३४-१२ | ३६-८ | ३६-७ | ३५-१ |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| [illegible]; २१३२-८ | ४०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | ११३७-८ | १११७-८ | १११० | ११०५ | १०६० |
| ११८०; ६५८ | १३-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६४३ | ६४१ | ६५१ | ६५२ | ६४४ |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ६६१ | ६५५ | ६५५ | ६५३ | ६३८ |
| ५६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ३१८ | ३१७ | ३१९ | ३१२ | ३०६ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३१९ | ३१६ | ३१७ | ३१३ | ३०७ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३२७ | ३३२ | ३३८ | ३३६ | ३२८ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै. | सिंप्लेक्स | ५० | ३६६ | ३५६ | ३५९ | ३५६ | ३४६ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-८-६ | ४-८ | ४-७ | ४-६ | ४-४ |
| २१-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १६-८ | १६-९ | १६-१५ | १६-१४ | १५-८ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्ड्स | १ | ३-२ | ३-२ | ३-३ | ३-२ | ३-० |
| ११९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ५७५ | ५६८-१२ | ५६७-८ | ५७७-८ | ५७५ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १७५ | १७३-८ | १७४-४ | १७४ | १७२ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २७६ | २७३ | २७३ | २७३ | २६९ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४८७-८ | ४८० | ४८० | ४८७-८ | ४७० |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३२-६ | ३१-१५ | ३२-४ | ३२-१ | ३१-८ |

**म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि.**—म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि. नें प्रत्येक १० रुपयाचा असे ४०,००० नवे शेअर्स प्रत्येकीं ४ रु. वाढाव्यानें विक्रीस काढले होते. भागीदारांनीं करावयाच्या अर्जाची मुदत १५ जून रोजीं संपली, परंतु दूरच्या भागीदारांस वेळ मिळावा म्हणून त्यांचे सोईसाठी ही मुदत ३० जून पर्यंत वाढविण्यांत आली आहे.

**सदर्न निटिंगचें ८% डिव्हिडंड**—सदर्न निटिंग वर्क्स लि. नें आपल्या दहाव्या वर्षाकरितां ६% डिव्हिडंड + २% बोनस मंजूर केलें आहे.

**शिलकी पौंडांच्या येण्याच्या वाटाघाटी**—हिंदुस्थानाच्या लंडनमधील शिलकी येण्याच्या प्रश्नाविषयीं वाटाघाटी करण्याकरिता पाकिस्तान व संयुक्त हिंदुस्थान ह्यांचीं दोन स्वतंत्र मंडळें ब्रिटिश सरकार बोलावणार आहे ह्या बातमीचा लंडनमध्यें अधिकृत रीत्या इनकार करण्यांत आला आहे. रिझर्व्ह बँकेची जोपर्यंत फाळणी झालेली नाहीं, तोपर्यंत रिझर्व्ह बँकच ह्या वाटाघाटींतील महत्त्वाचा घटक आहे.

**पो. ऑ. कॅश सर्टिफिकेटांची विक्री बंद**—१४ जून, १९४७ पासून नवी कॅश सर्टिफिकिटें विकण्याचें पोस्ट ऑफिसांनी बंद केलें आहे.




## सांगली येथील नूतन स्थापत्य विद्यालयाचें उज्ज्वल भवितव्य

### प्रिन्सिपॉल गोखले ह्यांचें प्रारंभीचें भाषण

पुण्याच्या महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटीनें सांगलीजवळ विश्रामबाग येथें 'न्यू इंजिनिअरिंग कॉलेज' ता. २३ जून १९४७ पासून सुरू केलें आहे. मुंबई विद्यापीठास प्रस्तुत कॉलेज जोडलें असून सिव्हिल इंजिनिअरिंगच्या पहिल्या वर्षाचा वर्ग सुरू झाला आहे. विस्तीर्ण मैदानावर कालेजची भव्य इमारत उभारण्यांत येत आहे. सांगलीचे हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब ह्यांनीं संस्थेस १ लक्ष रुपयांची देणगी दिली आहे. कराचीच्या इंजिनिअरिंग कॉलेजचे सेवानिवृत्त प्रिन्सिपॉल श्री. जी. एन. गोखले ह्या कॉलेजासहि प्रिन्सिपॉल लाभले असून अध्यापक वर्गात मुंबईचे प्रा. एस. बी. जोशी, कराचीचे प्रा. कर्डिले, लखनौचे प्रा. के. जी. देवधर, प्रभृति अनुभवी स्थापत्य शास्त्रज्ञ आहेत. श्री. व्ही. जे. कुंटे हे कॉलेजच्या इमारतीचे रेसिडेंट इंजिनिअर म्हणून काम पहात आहेत. पुण्याचे मुरब्बी इंजिनिअर व बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे अध्यक्ष श्री. धों. कृ. उर्फ धोंडूमामा साठे हे ह्या संस्थेचे प्राण असून त्यांच्या दीर्घ श्रमानें संस्थेची मुहूर्तमेढ रोवली गेली आहे व आतांपर्यंतच्या प्रगतीनें तिचें यश निश्चित केलं आहे. "स्थापत्यशास्त्रज्ञ कोणास म्हणावें" ह्या विषयावर न्यू इंजिनियरिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल जी. एन. गोखले ह्यांचें कॉलेजमध्यें दाखल झालेल्या पहिल्या साठ विद्यार्थ्यांसमोर सुरवातीच्या दिवशीं कळकळीचें भाषण झालें. आपण व आपले सहकारी विद्यार्थ्यांना अव्वल दर्जाचे स्थापत्य विशारद बनविण्याचे शक्य ते प्रयत्न करूं असें त्यांनीं आश्वासन दिलें.

कॉलेजाला मुंबई विश्वविद्यालयाची मान्यता मिळाली आहे.

## 'प्रॉपर्टी टॅक्स' व प्राप्तीवरील कर

### मुंबई हायकोर्टाचा महत्त्वाचा निर्णय

राहत्या इमारतींच्या उत्पन्नावर प्राप्तीवरील कराची आकारणी करतांना त्या इमारती बांधण्यासाठीं उभारलेल्या भांडवलाचा महाणाचा अथवा अन्य बोजा जर त्या इमारतींवर ठेवलेला असेल तर त्यांचे व्याजापोटीं दिलेली रक्कम एकूण उत्पन्नांतून वजा करण्यांत येते. त्याचप्रमाणें भांडवल उभारणी व्यतिरिक्त अन्य कांहीं रकमेचा वार्षिक बोजा जर इमारतीवर असेल तर त्याचीहि रक्कम वजा घालण्यांत येते. म्हणून न्यू पीसगुड्स बझार कं. लि. नें आपल्या मालकीच्या इमारतींच्या उत्पन्नावर प्राप्तीवरील कर भरण्याचे वेळीं असा दावा मांडला कीं, कंपनीनें भरलेल्या 'म्युनिसिपल प्रॉपर्टी टॅक्स' व 'अर्बन इम्मुव्हेबल प्रापर्टी टॅक्स' यांच्या रकमा इमारतींच्या उत्पन्नावरील वार्षिक बोजाच्या स्वरूपाच्या असल्यामुळें एकूण उत्पन्नांतून त्या वजा घालण्यांत याव्या व उरलेल्या उत्पन्नावरच कराची आकारणी व्हावी.

मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश सर लिओनार्ड स्टोन व दुसरे दोघे न्यायाधीश श्री. छगला व श्री. कोयाजी यांच्या पूर्ण न्यायमंडळानें (फुलबेंचनें) नुक्ताच या दाव्याचा निर्णय केला.

प्राप्तीवरील कराच्या आकारणीसाठी इमारतींचें वार्षिक मूल्य ठरवितांना मालकाच्या हातांत उत्पन्न प्रत्यक्षपणें किती पडलें हें प्रमाण आधारभूत नसून उत्पन्न किती येऊं शकलें असतें तें प्रमाण आधारभूत होय, असें न्यायाधीशांचें मत पडलें. शिवाय मालमत्तेवरील नागरी व ग्रामीण कर हे दोन्हीहि मालमत्तेपासून मिळणाऱ्या उत्पन्नावरील कर नसून प्रत्यक्ष मालमत्तेवरीलच कर आहेत. तेव्हां ते उत्पन्नांतून वजा घालतां येणार नाहींत. बरें, या करांच्या रकमांचा वार्षिक बोजा इमारतींच्या उत्पन्नावर आहे असें समजावें तर त्यालाहि आधार नाहीं. कारण वेळच्या वेळीं हे कर दिले तर त्यांचा बोजा मालमत्तेवर केव्हांहि नसतो. कराची रक्कम देणें झाली व ती दिली नाहीं म्हणजे मगच मालमत्तेवर त्या करांचा बोजा उत्पन्न होतो. म्हणून ह्या करांच्या रकमा कंपनीच्या इमारतींच्या उत्पन्नांतून वजा घालतां येणार नाहींत असा न्यायाधीशांनीं निकाल दिला. सारांश, कर-पात्र उत्पन्नाचा आंकडा ठरवितांना मालमत्तेवरील कराची जी रक्कम करदारांनीं भरली असेल ती उत्पन्नांतून वजा घालतां येणार नाहीं. त्या रकमासह एकूण सर्व उत्पन्नावरच प्राप्तीवरील कर द्यावा लागेल. कायद्यानें मान्य केलेल्या वजावटी केव्हांहि वजा घालतां येतीलच, पण त्या वजावटींत मालमत्तेवरील कराचा समावेश होत नाहीं.

---

**सिनेमाप्रेक्षकांच्या सूचना**—सिनेमा थिएटरांच्या व्यवस्थेंत तुम्हीं कोणत्या सुधारणा सुचवितां? ह्या प्रश्नास प्रेक्षकांनीं दिलेल्या उत्तरांपैकीं कांहीं खालीं दिलीं आहेत:—

रांगेंत उभें रहाणारांच्या वर छपराची व्यवस्था करा. लहान मुलांस आणण्याची बंदी करा. धूम्रपानास मनाई करा. खुर्च्यांचे रांगांत जास्त अंतर ठेवा. थिएटराच्या नोकरवर्गाची आपसांतील बडबड थांबवा. हवाशीरपणा वाढवा. अगोदर रिझर्व्ह करतां येण्याजोग्या जागा वाढवा. चहा विका. चहा विकूं देऊं नका. तिकिटांचे दर कमी करा. दरवाजावरील नोकरांच्या बॅटरीचा उपद्रव बंद करा.

**बिहारमधील जमीनदारी**—बिहारमधील जमीनदारी पद्धत रद्द करण्यासंबंधीच्या बिलाचा एक मसुदा डिव्हिजनल कमिशनर्स, किसान सभा व वकीलवर्ग ह्यांच्या मतप्रदर्शनासाठी बिहार सरकारनें प्रसृत केला आहे.



सारस्वत

को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८] सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ ३१-५-१९४७

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,९७,३४० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. २,०४,००० |
| ठेवी ... | रु. ६९,७३,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ७६,७५,००० |

स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम

व्याज : २ टक्के

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब-ऑफिस : दादर, (बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर)

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११

—मुख्य कचेरी—

सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग

९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई.

शाखा ५०

खेळतें भांडवल रु. ७,३१,००,०००

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—

व्ही. पी. वर्दे

ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.